# <u>प्रेसनोट</u>

दि. ०१/०९/२०२३

## महावितरण कार्यालयाच्या उपकेंद्र बाणेर येथील सहायक अभियंत्यावर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५७ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | रविंद्र नानासाहेब कानडे, वय ३७ वर्ष, पद - सहायक अभियंता (वर्ग-२) महावितरण कार्यालय, उपकेंद्र बाणेर, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये (पन्नास हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५०,०००/- रुपये (पन्नास हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दिनांक २८/०८/२०२३, दि. २९/०८/२०२३ व दि. ३१/०८/२०२३ |
| सापळा दिनांक | ०१/०९/२०२३ |

ठिकाण :- महावितरण कार्यालय उपकेंद्र बाणेर, पुणे येथील कार्यालयाचे आवारात.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे सरकारी विद्युत ठेकेदार असून, त्यांना आर.एम.सी. प्लांटसाठी लागणा-या विद्युत पुरवठाचा ठेका मिळाला होता. सदरचे काम शासकीय योजना १.३ टक्के तत्वाच्या (MSEDCL) नियमानुसार पुर्ण केले असून, सदर कामाच्या पुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी लोकसेवक रविंद्र कानडे यांनी ५०,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक रविंद्र कानडे यांनी तक्रारदार यांचेकडे शासकीय योजना १.३ टक्के तत्वाच्या (MSEDCL) नियमानुसार पुर्ण केले असून, सदर कामाच्या पुर्णत्वाचा दाखला देण्याकरीता ५०,०००/- रुपयांची लाचेची पंचासमक्ष मागणी करुन, ५०,०००/- रुपये (पन्नास हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.